निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २०० वा.
मंगळवार - २३ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


## लोकनाट्य व तमाशा यांच्या नावात बदल सुचविण्याचा प्रस्ताव समितीपुढे - सांस्कृतिक कार्य मंत्री डॉ.आशिष शेलार

**मुंबई** / लोकनाट्य/ तमाशा हे नाव संगीतबारी कला केंद्रासाठी न वापरण्याचे बंधन असावे, या तमाशा कलावंत संघटनेच्या मागणीचा प्रस्ताव यापूर्वी स्थापित झालेल्या समितीकडे पाठविण्यात यावा. या समितीने कलाकेंद्र व तमाशा यांच्या नावात बदल सुचविण्याबाबतचा निर्णय पुढील १५ दिवसात द्यावा, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी दिले.

तमाशा कलावंताच्या विविध प्रश्नासंदर्भात आज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे मंत्री ड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभिषण चवरे, गृह विभागाचे उपसचिव अ.नि.साखरकर, अवर सचिव बाळासाहेब सावंत, अखिल भारतीय लोक कलावंत मराठी तमाशा परिषदेचे अध्यक्ष संभाजीराजे जाधव, सल्लागार खंडुराज गायकवाड, अविष्कार मुळे, किरणकुमार ढवळपुरीकर, रघुवीर खेडकर, शेषराव गोपाळ, आनंद भिसे, सुनिल वाडेकर उपस्थित होते.



राज्यातील तमाशा आणि कलाकेंद्र कलावंतांच्या विविध तक्रारींचे निवारण करण्यासाठी दोन स्वतंत्र समित्यांच्या गठनाचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी यापूर्वीच घेतला आहे. या समितीची कार्यकक्षा वाढवून नावात बदल करण्याबाबत ही समिती उपाययोजना सुचवेल, असे मंत्री ड.शेलार यांनी सांगितले. त्याचबरोबर, या लोक कलावंतांना गावोगावी कला सादर करण्यासाठी विविध परवानग्यांची आवश्यकता असते. यासंदर्भातही या नियुक्त समितीने उपाययोजना सुचवून पुढील १५ दिवसात अहवाल देण्याचे निर्देश मंत्री ड.शेलार यांनी दिले.

# महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळजनक ट्विस्ट येणार!

# अरुण गवळी यांच्या राजकीय पक्षाने निवडणुकीबाबत घेतला मोठा निर्णय..

**मुंबई** / लवकरच महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, ग्राम पंचायत तसेच जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे बिगुल वाजणार आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष आहे मुंबई महानगपालिकेच्या निवडणुकीकडे. मुंबई महापालिका काबीज करण्यासाठी महायुती तसेच महाविकासआघाडीने कंबर कसली आहे. तर, दुसरीकडे दोन्ही ठाकरे एकत्र आले आहेत. अशातच आता महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एक खळबळजनक ट्विस्ट येणार आहे. अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी यांच्या राजकीय पक्षाने निवडणुकीबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

अरुण गवळी सक्रीय राजकारणात उतरणार नाहीत, पण त्यांची अखिल भारतीय सेना मात्र मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. अरूण गवळी यांची मुलगी आणि माजी नगरसेविका गीता गवळी यांच्या नेतृत्वाखाली महापालिका निवडणूक लढवली जाणार. अरूण गवळी यांच्या दोन्ही मुली निवडणूक लढवणार. अरूण गवळींची दुसरी मुलगी योगिता गवळीही पहिल्यांदाच निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. याअगोदर मुंबई महानगर पालिकेत अरुण गवळी यांच्या अखिल भारतीय सेनेचे दोन नगरसेवक होते. यापैकी माजी नगरसेविका वंदना गवळी या शिंदेंच्या शिवसेनेत गेल्या आहेत. वंदना गवळी यांच्या विरोधात देखील अखिल भारतीय सेनेचा उमेदवार देणार असल्याची माहिती गीता गवळी यांनी दिली.





१९९० च्या दशकात मुंबई पोलिसांच्या वाढत्या दबावापासून आणि टोळीयुद्धांपासून वाचण्यासाठी अरुण गवळींनी राजकारणात प्रवेश केला. अरुण गवळींनी अखिल भारतीय सेना (-इड) नावाचा पक्ष स्थापन केला. २००४ मध्ये त्यांनी चिंचपोकळी येथून विधानसभा निवडणूक जिंकली आणि आमदार झाले. २००७ मध्ये शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येप्रकरणी अरुण गवळी यांना महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याच्या (चउजउ-) अंतर्गत दोषी ठरवण्यात आले. तब्बल १८ वर्षानंतर अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीची जेलमधून सुटका झाली.

## मराठवाड्यातील अतिवृष्टीचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आढावा

### मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून साधला संवाद

ठाणे / मराठवाड्यातील अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लक्ष ठेवून असून, मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद साधून त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या नागरिकांना तातडीने मदत करून सुरक्षितस्थळी हलविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच उपमुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव व संचालकांशी बोलून त्यांना सूचनाही दिल्या. मराठवाड्यात सर्वत्र अतिवृष्टी झाल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पूर परिस्थितीचा आढावा घेऊन लोकांना तत्काळ मदत पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. यावेळी बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला. दरमान धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील ढगपिंपरी गावातील नागरिक पूर परिस्थितीत अडकल्याचे त्यांना समजले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी जिल्ह्याधिकाऱ्यांशी बोलून तत्काळ एनडीआरएफच्या मदतीने हेलिकॉप्टर पाठवून पुराच्या वेढ्यात अडकलेल्या नागरिकांना तातडीने एअरलिफ्ट करून सुरक्षितस्थळी नेण्याचे निर्देश दिले. तसेच कोणतीही मदत लागल्यास तत्काळ आपल्याशी संपर्क साधावा आणि वेळोवेळी पूर परिस्थितीची माहिती आपल्याला द्यावी असेही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले.



## विविध कल्याणकारी उपक्रम, योजनांवर राष्ट्रीय पोस्टर डिझाईन स्पर्धा

**मुंबई** / देशवासीयांचे भविष्य घडविणाऱ्या विविध कल्याणकारी योजना, अभियान, उपक्रमांवर आधारित राष्ट्रीय पोस्टर डिझाईन स्पर्धा भरविण्यात येत असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी केली. या स्पर्धेत नव्या प्रतिभेच्या कलाकारांबरोबरच नामांकित कलाकारांनी भाग घ्यावा, असे आवाहन मंत्री ड. शेलार यांनी केले.

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे झालेल्या बैठकीस दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्यावतीने राष्ट्रीय पोस्टर डिझाइन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेची 'टर्न व्हिजन इनटू आर्ट : डिझाइन द पोस्टर, सेलिब्रेट द डिकेड' अशी थीम ठेवण्यात आली आहे. ही स्पर्धा सर्व नागरिकांसाठी खुली आहे.




मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्वच्छ भारत अभियान, आत्मनिर्भर भारत, बेटी बचाओ, बेटी पढाओ, स्किल इंडिया, वेव्हज समिट, वातावरण बदल, योगा आदी विषय या स्पर्धेसाठी ठेवण्यात आले आहेत.

स्पर्धकांना ए२ आकारातील पोस्टर पीडीएफ, जेपीईजी, पीएनजी (हाय-रेझोल्यूशन) मध्ये www.pmvision2art.com या संकेतस्थळावर ७ ऑक्टोबरपर्यंत अपलोड करायचे आहेत.

स्पर्धेतील यशस्वी ७५ विजेत्यांना पारितोषिके, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात येईल. तसेच त्यांची कलाकृती प्रमुख कला दालनांमध्ये प्रदर्शित केली जाईल. त्याचबरोबर विजेत्यांची कलाकृती एका विशेष कॉफी-टेबल बुकमध्ये समाविष्ट करण्यात येईल. या स्पर्धेसाठी ॲडव्हर्टायझिंग एजन्सीज असोसिएशन ऑफ इंडियाचे विशेष सहकार्य लाभले आहे.

## शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार? सरकार घेऊ शकतं मोठा निर्णय

राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्याचं प्रचंड नुकसान झालंय. मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसाने शेतातील पिकांचं होत्याचं नव्हतं झालंय. शेतांमध्ये पाणी साचल्यानं पिकं कुजायला लागलीयत. त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठं संकट कोसळलंय. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच अतिवृष्टीमुळे मोठं नुकसान झालंय. बीड, संभाजीनगर, जालना, परभणी आणि नांदेडमध्ये पावसाने धुमाकुळ घातला आहे. तर तिकडे सोलापूर आणि पुण्यातही पावसाने हाहाकार माजवला आहे. तब्बल ७ ते ८ दिवसांपासून या जिल्ह्यांमध्ये पावसाचं थैमान पाहायला मिळालं. जाहीर करण्यासह कर्जमाफी आणि हमीभावाच्या मुद्द्यावरून मनसेनं राज्यभर आंदोलन सुरु केलंय. त्याचाच एक भाग म्हणून मनसेनं नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतक-यांसह आंदोलन केलं.

मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीपुढे शेतकरी हतबल झालाय. तर दुसरीकडे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची मदत दिवाळीपूर्वीच शेतक-यांच्या खात्यात जमा होणार असल्यची घोषणा कृषीमंत्री दतात्रय भरणे यांनी केलीय. राज्यभरात शेतीच्या नुकसानीचे पंचनामे सुरू असून त्यानंतर तातडीने मदत दिली जाईल असं कृषिमंत्र्यांनी




यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात शिल्लक राहिला फक्त आणि फक्त चिखल. तर अनेक ठिकाणी अलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरडून गेल्यामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालंय. त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करून तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येतेय. तर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५ लाख रुपयांची मदत देण्याची मागणी भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केलीय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत सुरेश धस यांनी ही मागणी केलीय. तर अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालंय. शेतकऱ्यांना मदत देण्याची शक्ती सरकारला द्यावी असं साकडं देवीला घातल्याचं पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटलंय.

दरम्यान शेतक-यांच्या प्रश्नावरून मनसे मैदानात उतरलीय. ओला दुष्काळ म्हटलंय. दरम्यान ओला दुष्काळ जाहीर करण्याबाबत मात्र त्यांनी कुठलीही थेट माहिती दिलेली नाही. याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री घेतील असं त्यांनी सांगितलंय.

ओल्या दुष्काळाबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री निर्णय घेतील निसर्गाच्या लहरीपणामुळे पेरलेलं उगवेल का आणि उगवलेले पिक जगेल का याची शाश्वती राहिलेली नाहीय.. मागील ७ ते ८ दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पिकांचा चिखल झालाय आणि शेतकऱ्याच्या हातात हतबल होऊन पाहण्या पलिकड़े काहीही राहिलेलं नाहीय. त्यात आता सरकारने दिवाळीपूर्वी भरपाई देण्याची घोषणा करून शेतकऱ्यांनी मोठा दिलासा दिलाय. त्यामुळे कृषीमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळून शेतकऱ्यांना मदतीचा हात देऊन बळीराजा आधार द्यावा हीच अपेक्षा.

## बीड-परळी रेल्वेमार्गासाठी उर्वरित भूसंपादन प्रक्रियेला गती द्यावी - उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

**मुंबई** / मराठवाड्याच्या सामाजिक, आर्थिक विकासाला गती देण्यासाठी बीड ते परळी रेल्वेमार्ग लवकरात लवकर सुरु करण्याची गरज आहे. हा रेल्वे मार्ग झाल्यानंतर परळी ते थेट अहिल्यानगरपर्यंत प्रवास करता येणार आहे. त्यामुळे या मार्गासाठी उर्वरित भूसंपादन प्रक्रियेला गती द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रेल्वे आणि संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

पुणे येथे अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारशी समन्वय ठेऊन प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. यावेळी पुणे मेट्रो लाईन-३ शिवाजी नगर ते हिंजवडी या प्रकल्पाचे काम गतीने पूर्ण करावे.

प्रकल्पाचे काम दर्जेदार झाले पाहिजे, अशी सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. सणासुदीचे दिवस असल्याने मेट्रो प्रकल्पांचे काम करीत असताना पुलांखाली वाहतुक कोंडी होऊ नये याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. कर्जत-भिमाशंकर-खेड-शिरुर हा नवीन महामार्ग करण्यासंदर्भात त्यांनी आढावा घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात 'उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षा'ची बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश कुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेशकुमार जैसवाल, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, राज्यकर आयुक्त आशिष शर्मा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी वढू व तुळापूर येथील स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज स्मारक, पुणे येथील वीर वस्ताद लहूजी साळवे स्मारक, लोणावळा येथील नियोजित स्काय वॉक, टायगर पॉईंट, 'सारथी' संस्थेच्या नाशिक, कोल्हापूर, नागपूर, खारघर, संभाजीनगर, अमरावतीच्या विभागीय उपकेंद्रांचे बांधकाम, सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालय, सातारा सैनिक स्कूल, वडाळा येथील जीएसटी भवन, रेडिओ क्लब मुंबई, रत्नागिरीचे मिरकरवाडा बंदर, कृषी भवन, कामगार कल्याण भवन, सहकार भवन, पुरंदर विमानतळ, ऑलंम्पिक भवन व संग्रहालय, पुणे, परळी आणि बारामती शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय आदी प्रकल्पांच्या प्रगतीचा देखील आढावा घेतला.

यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, 'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, क्रिडा आयुक्त शितल तेली-उगले, सहकार आयुक्त दिपक तावरे, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप पी., पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. अजय चंदनवाले यांच्यासह पुणे मेट्रो, पीएमआरडीए, संबंधित जिल्ह्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीचे संचालन उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव विकास ढाकणे यांनी केले.

# सार्वजनिक आयुष्याचा पाच दशकांपेक्षा जास्त काळाचा अनुभव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गाठीशी..

सार्वजनिक प्रशासनाच्या क्षेत्रात भारत काहीतरी अभूतपूर्व करण्याचा प्रयत्न करत आहे. तो केवळ अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची पद्धतच नव्हे, तर त्यांच्या सेवा देण्यामागच्या उद्दिष्टातही बदल घडवून आणतो आहे. मिशन कर्मयोगी–नागरी सेवा क्षमता वृद्धीचा एक महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय कार्यक्रम. हा कार्यक्रमच या बदलाचे इंजिन आहे आणि त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीची छाप अगदी ठळकपणे दिसून येते. खरेतर, कोणत्याही सरकारचे नेतृत्व करण्याचा २५ वर्षांपेक्षा जास्त काळाचा आणि त्याचवेळी सार्वजनिक आयुष्याचा पाच दशकांपेक्षा जास्त काळाचा अनुभव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गाठीशी आहे. त्यामुळे तर ते खऱ्या अर्थाने या संपूर्ण व्यवस्थेचे कार्यान्वयक वाटतात, जुनाट निरुपयोगी प्रथा बदलण्यासाठीची एका सुधारकामधील अधीरता त्यांच्यात दिसते, महत्त्वाचे म्हणजे ते ध्रुवताऱ्याप्रमाणेच नागरिक प्रथम, विकसित भारत या सुस्पष्ट ध्येयाने वाटचाल करत आहे. मिशन कर्मयोगीचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे हा काही केवळ वरवरचा मनुष्यबळ विकासातील सुधारणांचा उपक्रम नाही, तर हे अभियान म्हणजे मूल्यांवर आधारित, कामगिरीवर भर देणारे, भारताच्या नागरी सेवांसाठीचे एक परिवर्तनकारी पुनर्संरचात्मक अभियान आहे.

या कार्यक्रमांतर्गत तीन महत्त्वाचे निर्णायक बदल केले. पहिला हा सरकारी अधिकाऱ्यांच्या मानसिकतेतला आहे. या अंतर्गत आता ते स्वतःला कर्मचारी मानण्याऐवजी कर्मयोगी समजू लागतील. दुसरा हा बदल कामाच्या ठिकाणासंबंधीचा आहे. या अंतर्गत आता कामगिरीसाठी वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यापासून ते कार्यप्रणाली आणि व्यवस्थेतील अडथळ्यांचे शोध घेऊन ते दूर केले जातील. तिसरा महत्त्वाचा बदल हा सार्वजनिक मनुष्यबळ व्यवस्थापन व्यवस्थेत गतिशीलता आणण्याशी आणि संबंधित क्षमता विकास यंत्रणेशी संबंधित आहे. या अंतर्गत नियमांऐवजी भूमिकेला आधारभूत मानले जाईल. या नव्या संरचनेचे शिल्पकारही पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत आणि म्हणूनच तर २१व्या शतकातील शासनाच्या अपेक्षांच्या बाबतीतील त्यांच्या दूरदृष्टीतून ती नेमकेपणाने आखली गेली आहे. आधी मुख्यमंत्री आणि नंतर पंतप्रधान म्हणून. मोदी यांनी एक संपूर्ण सरकार या संस्कृतीला चालना दिली. त्यांनी वेगवेगळ्या विभागांमधील अडथळे दूर केले. मंत्र्यांमध्ये विविध विषयांवर परस्पर विचारविनिमय करण्याबाबत आग्रह धरला आणि केवळ फायली पुढे सरकवण्याऐवजी व्यवस्थेवर आधारलेल्या उपाययोजनांना प्राधान्य दिले. हीच तत्त्वे आपल्याला कोरोना महामारीच्या काळात अनुभवायता आली. त्यावेळी सरकारचा प्रत्येक स्तर, उद्योग, नागरी समाज आणि नागरिक स्वयंसेवक या सर्वांनी आपण परस्पर भागीदारीतले एक राज्य असल्याच्या भावनेतूनच काम केले. याच सहकाऱ्याच्या मानसिकतेला गती–शक्तीसारख्या सुधारणांची जोड मिळाली असून, त्यामुळे त्याला संस्थात्मक स्वरूपही येऊ लागले आहे.

अधिकाऱ्यांनी एकत्र राहात पदांच्या स्तरातला फरक विसरून विचारमंथन करण्याची संस्कृती रुजवणारे गुजरातमधून सुरू झालेले चिंतन शिबिर आता केंद्र सरकारच्या धोरणांचा भाग बनले आहे. स्वतःचे ज्ञान आणि कौशल्ये सतत वृद्धिंगत करण्याबरोबरच, पंतप्रधान कार्यालयाचे अधिकारी ळत्रऋजढ या डिजिटल व्यासपीठाचा वापर करतात की नाही, यावर त्यांचे जातीने लक्ष असते. दखल घ्यावी अशी बाब म्हणजे, समावेषकतेच्या अनुषंगाने ते संस्थात्मक स्मृतीला फारच गांभीर्याने घेतात. पंतप्रधान पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी लगेचच, आपल्या मंत्र्यांना अनेक दशके या व्यवस्थेत काम करत असलेल्या, आपापल्या सहाय्यक आणि कक्ष अधिकाऱ्यांकडून संबंधित विभागाच्या कामकाजांविषयी शिकण्याचा आग्रह धरला. प्रत्यक्ष वास्तव स्वरूपात एखाद्या कार्यसंस्कृतीत बदल होणे म्हणजे काय, याचेच हे ठळक उदाहरण आहे. दुसरीकडे, प्रत्यक्ष जमिनीवर घडून आलेल्या या सुधारणांचा कणा म्हणजे योग्य उद्देशाने केला गेलेला तंत्रज्ञान उपयोग. ळत्रऋजढ–घरीरूसळ व्यासपीठ ही या प्रयत्नांतर्गत एक सर्वसमावेशक, कधीही–कुठेही उपलब्ध होऊ शकणारी शिक्षण–प्रशिक्षण व्यवस्था आहे. या सुविधेअंतर्गत ३ हजारांहून अधिक पूर्व निश्चित वेळापत्रकीय नियोजनानुसार पूर्ण करता येतील अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. महत्त्वाचे म्हणजे ही सुविधा सर्वांसाठी उपलब्ध करून दिली गेली असल्याने, त्या माध्यमातून एकप्रकारे शिक्षणाचे लोकशाहीकरणच घडून आले आहे. या व्यवस्थेच्या माध्यमातून आत्तापर्यंत लाखो अधिकाऱ्यांना नवीन कायदेशीर चौकटींबाबतचे प्रशिक्षण दिले गेले आहे, या अंतर्गत सेवाभाव या उपक्रमाअंतर्गत देशभरातील लाखो पोलीस, डॉक्टर आणि इतर कर्मचारी नागरिकांसोबतच्या संवादात सुधारणा घडवून आणण्यासाठी आपली कौशल्ये अधिक वृद्धिंगत करू लागले आहेत, इतकेच नाही तर मोठ्या संख्येतील मनुष्यबळाने कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (खेढ) यांसारख्या उद्योन्मुख तंत्रज्ञानामधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केले. एका अर्थाने या सगळ्यांतून पंतप्रधानांचे स्वतःचे तंत्रज्ञान स्नेहत्वाला प्राधान्य देणारे व्यक्तिमत्त्वच आता संस्थात्मक ताकदीत रूपांतरित झाले असल्याचीच प्रचिती येते.



या सगळ्यांइतकेच महत्त्वाचे आहे तो या कार्यक्रमाचा तात्त्विक गाभा. कारण मिशन कर्मयोगीच्या माध्यमातून आपल्या प्राचीन नागरी संस्कृतीचे ज्ञान आधुनिक राज्यकारभाराशी जोडण्याचा ठोस प्रयत्न केला जातो आहे. त्यामुळेच तर या अभियानाअंतर्गत विकास, गर्व, कर्तव्य आणि एकतेसोबतच स्वाध्याय, सहकार्यता, राज्यकर्म आणि स्वधर्म यांसारख्या वैयक्तिक सद्गुणांना परस्परांसोबत जोडत अंतर्भूत केले गेले आहे. थोडक्यात ही काही केवळ स्मरणरंजनाची बाब नाही, तर हा उपक्रम म्हणजे क्षमतांना चारित्र्याचा आधार देण्याच्या उद्देशाने उच्च तंत्रज्ञानाच्या युगाला एका व्यावहारिक नितिमूल्यांची जोड देण्यासाठी केला जात असलेला ठोस प्रयत्न आहे. नागरिक केंद्रितता अर्थात जन भागीदारी हा या अभियानाचा दुसरा महत्त्वाचा स्तंभ आहे. प्रत्येक सार्वजनिक निर्णयात नागरिकच केंद्रस्थानी असले पाहिजेत, यावर पंतप्रधान मोदी यांनी सातत्याने भर दिला. हाच त्यांच्या शासन व्यवस्थेचा मूलमंत्र आहे. या अंतर्गत धोरण आणि वितरण व्यवस्थेत लोकांची भागीदारी दिसून येते आणि मग त्याच अनुषंगाने अधिकारी देखील अगदी अखेरच्या व्यक्तीपर्यंत सेवा पोहोचवण्यासाठी स्वतःची जडणघडण करतात.दुसरीकडे आत्मनिर्भरता अर्थात स्वावलंबित्व हे या सगळ्याला पूरक ठरणारे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरले आहे. खरेतर आत्मनिर्भरता म्हणजे काही 'एकला चालो रे'ची भावना नाही, तर त्या उलट ती प्रत्यक्षात मुक्तपणा आणि जागतिक स्पर्धेने प्रेरित आपापल्या क्षमता आणि आपल्यातल्या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. हाच दृष्टिकोन क्षमता निर्मितीच्या प्रयत्नांमधून आणि चूर्त्रें सारख्या व्यासपीठांच्या वाढत्या वापरामधून दिसून येतो. खरे तर या कार्यक्रमाच्या या संपूर्ण संस्थात्मक रचनेतून पंतप्रधान मोदी यांच्या व्यावहारिकतेचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसते. उच्चस्तरीय मार्गदर्शनासाठी पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील मनुष्यबळ विकास परिषद, समन्वयासाठी कॅबिनेट सचिवालय युनिट, क्षमता निर्माण आयोग (उइउ) संरक्षक आणि मानक निर्धारक आणि या सगळ्याचा कणा असलेल्या डिजिटल व्यवस्था आणि बाजारपेठांना चालना देण्यासाठीचे कर्मयोगी भारत नावाचे एक स्पेशल परपज व्हेहीकल (डझत) ही त्याचीच उदाहरणे आहेत. मुळात या संपूर्ण व्यवस्थेची संरचना म्हणजे शासनासाठी कुठूनही काम करून घेता येणारी सहकार्यपूर्ण, लेखा परीक्षण करता येण्याजोगी आणि परिणाम केंद्रित व्यवस्था आहे. महत्त्वाचे म्हणजे, भारत जे काही शिकत आहे ते स्वतःजवळच बाळगून बसत नाही. त्या उलट वसुधैव कुटुंबकम्च्या भावनेतून, सार्वजनिक प्रशासनात एक आदर्श निर्माण करण्याच्या उद्देशाने भारत, जे ज्ञान, अनुभव आणि साधने विकसित करतो आहे, ते सर्व सामायिक करण्यासाठीही सज्ज होतो आहे.

भारताचा हा दृष्टिकोन ग्लोबल साउथ अंतर्गत येणाऱ्या देशांसाठी खूपच महत्त्वाचा ठरला आहे, कारण तंत्रज्ञानातील बदलांमुळे आज अनेक देशांना क्षमतांसंबंधीच्या अशाच अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळेच तर भारताने याबाबतीत मॉरिशसलाही या आधीच मदत देऊ केली आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, मिशन कर्मयोगीच्या माध्यमातून एखाद्या दूरदर्शी कल्पनेला एका व्यवस्थेत रूपांतरित केले जाते. या सगळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दीर्घकाळ शासन व्यवस्थेचा अनुभव, अडथळे दूर करण्याची त्यांची सहज प्रवृत्ती, तंत्रज्ञानासोबत सहजतेने जुळवून घेण्याचे त्यांचे कसब, संस्थात्मक स्मृतीबद्दलचा त्यांचा आदर आणि त्यांची नैतिकच्या अनुषंगाने त्यांचा समृद्ध शब्दसंग्रह याची जोड मिळाल्याने, संपूर्ण कार्यप्रणालीत एक अनुकरणीय व्यवस्थात्मक परिवर्तन घडून येते.

म्हणूनच तर त्याच भूमिकेवर आधारित मनुष्यबळ विकास, डिजिटल व्यवस्थेबद्दलचे सातत्यपूर्ण शिक्षण, लोक भागीदारी आणि नागरी संस्कृतीवर आधारित तत्त्वांचा अंतर्भाव असल्याचे दिसून येते. खरे तर कोणत्याही शासन व्यवस्थेचे भविष्य कशा प्रकारे सुरक्षित केले पाहिजे याचे हे ठोस उदाहरण असल्याचे निश्चितच म्हणता येईल. भारत याच मार्गावर कायम राहिला तर नागरिकांना आपले ऐकणाऱ्या, सातत्याने शिकणाऱ्या आणि सेवा देणाऱ्या शासनाचा अनुभव मिळू लागेल आणि हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिज्ञेचा खरा गाभा आहे. म्हणूनच तर, गेल्या काही दशकांतील कोणत्याही एका प्रशासकीय सुधारणेपेक्षा मिशन कर्मयोगी हे मला सर्वाधिक महत्त्वाचे वाटते. कारण हे अभियान म्हणजे लोकांची सेवा करणाऱ्या लोकांमध्ये पिढ्यानपिढ्या होणारी एक ठोस गुंतवणूक आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सगळ्यांची आखणी–मांडणी–रचना ही यासाठीच आपले संपूर्ण आयुष्य देणाऱ्या नेत्यानेच केली आहे.

## वैविध्यपूर्ण अभियानाचा गौरव..

यावर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार दक्षिण भारतातील लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेते मोहनलाल यांना जाहीर करण्यात आला आहे. अलिकडेच, भारत सरकारने २०२३च्या दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी नामांकन जाहीर केली होते. त्यानंतर मोहनलाल यांच्या नावाची सरकारतर्फे घोषणा करण्यात आली. दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीनुसार ही घोषणा करण्यात आली. हा पुरस्कार भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. अभिनेते मोहनलाल यांना आज म्हणजे २३ सप्टेंबर २०२५ रोजी ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये हा पुरस्कार प्रदान केला जाईल. दक्षिण भारताने भारतीय मनोरंजन विश्वाला अनेक महान कलाकार दिले त्यातीलच एक म्हणजे मोहनलाल. २१ मे १९६० रोजी केरळातील एलनथूर येथे येथे जन्मलेले मोहनलाल यांचे पूर्ण मोहनलाल विश्वनाथ नायर असे आहे. शालेय वयापासूनच अभिनयाची आवड असलेल्या मोहनलाल यांनी १९७८ साली थिरनोत्तम या मल्याळम चित्रपटातून चित्रपटसृष्टीत प्रवेश केला मात्र हा चित्रपट प्रदर्शित होऊ शकला नाही त्यामुळे १९८० साली प्रदर्शित झालेला मंजिल विरिंजा पुक्कल हा त्यांचा पहिला प्रदर्शित चित्रपट ठरला. विशेष म्हणजे या चित्रपटात त्यांनी नायकाची नाही तर खलनायकाची भूमिका केली मात्र ही भूमिका त्यांनी अशाप्रकारे वठवली की नायकापेक्षा त्यांनी साकारलेला खलनायकच भाव खाऊन गेला. हा चित्रपट त्यांच्यामुळेच हिट झाला. याच भूमिकेने त्यांना चित्रपटसृष्टीचे कवाडे उघडून दिले. या चित्रपटाद्वारे मल्याळम चित्रपट सृष्टीला नवा ताकदीचा अभिनेता मिळाला. हा चित्रपट त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. त्यांच्या घरासमोर निर्माते दिग्दर्शकाच्या रांगा लागल्या. त्यांचे चित्रपट एकापाठोपाठ हिट होऊ लागले. यशस्वी चित्रपटांची मालिकाच त्यांनी सुरू केली. दर पंधरा दिवसांनी त्यांचा एक चित्रपट प्रदर्शित होऊ लागला. विशेष म्हणजे सलग चित्रपट प्रदर्शित होऊनही प्रेक्षकांनी त्यांच्या चित्रपटाकडे पाठ फिरवली नाही कारण प्रत्येक चित्रपटात त्यांनी वेगवेगळी भूमिका साकारली. अभिनयातील वैविध्यामुळे ते आपली लोकप्रियता टिकवून ठेवू शकले. राजविंटे माकन या चित्रपटात त्यांनी साकारलेली डॉनची भूमिका त्यांचा कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. या चित्रपटानंतर त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली. पुलीमुर्गम हा त्यांनी अभिनय केलेला चित्रपट तर सुपरहिट ठरला. हा चित्रपट त्याकाळात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला . या चित्रपटाने त्या काळात १३० कोटी रुपयांची कमाई केली. दृश्यम या चित्रपटातील त्यांची भूमिका देखील लक्षवेधक ठरली. हा चित्रपट नंतर हिंदीतही आला ज्यात मोहनलाल यांची भूमिका अजय देवगण यांनी केली. अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयाच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी तर त्यांना नऊ वेळा नामांकन मिळाले त्यापैकी ४ वेळा त्यांना हा पुरस्कार मिळाला. वानप्रस्थम या चित्रपटात त्यांनी कथकली नृत्य सादर करणाऱ्या कलाकाराची भूमिका साकारली. या चित्रपटातील त्यांच्या अभिनयासाठी त्यांना पहिल्यांदा सर्वोत्कृष्ट अभिनयाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांनी जवळपास ३०० पेक्षा अधिक मल्याळम चित्रपटात भूमिका केल्या. केवळ मल्याळम नाही तर हिंदीसह अन्य दक्षिण भाषीय चित्रपटातही त्यांनी भूमिका केल्या. दक्षिणेतील इतर अभिनेत्यांप्रमाणे त्यांचेही हजारो फॅन्कलब आहेत. परदेशातही त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. जवळपास चाळीस वर्षांहून अधिक काळ अभिनय क्षेत्रात घालवलेल्या मोहनलाल यांना भारत सरकारने पद्मश्री सारखा मानाचा पुरस्कार देऊनही गौरविले आहे. आता दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवून सरकारने त्यांच्या वैविध्यपूर्ण अभिनय कारकिर्दीचा योग्य गौरव केला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनेते मोहनलाल यांचे मनापासून अभिनंदन!

# शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व्यक्ती नाही......

शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व्यक्ती नाही, तर तो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा एक शिल्पकार असतो. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांची भूमिका अधिकच आव्हानात्मक आणि महत्त्वाची झाली आहे. विसाव्या शतकात शिक्षणाच्या कल्पना पारंपरिक होत्या. सध्याच्या तंत्र बदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहेत. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाइन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक (रोबोटिक), परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना बदलावे लागणार आहे. ऑनलाइन शिकवण, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाइल प्स आणि वेबसाइट्स यांचा वापर वाढला. शिक्षकांना या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करावे लागेल. पारंपरिक शिक्षणपद्धती आणि नवीन तंत्रज्ञान यांचा मेळ घालणे हे आजच्या शिक्षकांपुढील मोठे आव्हान आहे. म्हणूनच आजच्या युगात शिक्षकांनी कसे असले पाहिजे, याबाबत सविस्तर विचार करणे गरजेचे आहे. दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस आपल्या देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्यांच्या योगदानाला सलाम करण्याचा दिवस आहे. ते एक महान शिक्षक, तत्त्वज्ञ आणि भारताचे दुसरे राष्ट्रपती होते. त्यांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. मात्र त्या पलीकडे जाऊन आजघडीला शिक्षकी पेशाचा विचार करणे आवश्यक आहे.

आजचे जग वेगाने बदलत आहे. माहितीचा महासागर इंटरनेटवर उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांनी केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. त्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. नवीन शोध, वैज्ञानिक प्रगती, सामाजिक आणि आर्थिक बदल याबद्दल त्यांना माहिती असणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी डिजिटल साक्षर असणे आवश्यक आहे. स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक प्सचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनवता येते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जागतिक घडामोडींची माहिती देणे, विविध विषयांवर ऑनलाइन संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे हे आधुनिक शिक्षकांचे कर्तव्य आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे होते, पण आजच्या युगात त्यांची भूमिका ज्ञान सोपे करून सांगणे आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे अशी झाली आहे. इंटरनेटमुळे आज माहिती सहज उपलब्ध असली तरी, त्या माहितीचे योग्य विश्लेषण करणे आणि तिचा योग्य वापर कसा करावा हे शिकवणे महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. प्रश्न विचारण्याचे, वाद-विवाद करण्याचे आणि स्वतःची मते योग्य प्रकारे मांडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी आणि क्षमता ओळखून कारकिर्दीचा योग्य पर्याय निवडण्यास मदत केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि पद्धत वेगळी असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांवर खूप शैक्षणिक आणि सामाजिक दबाव असतो. परीक्षेचा ताण, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमे आणि समवयस्कांकडून मिळणारा दबाव यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक ताण अनुभवतात. अशा वेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे केवळ शैक्षणिकच नव्हे तर मानसिक आधारस्तंभ म्हणून काम केले पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संवाद साधला पाहिजे, त्यांच्या समस्या ऐकून घेत मानसिक पातळीवर मदत केली पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे प्रोत्साहित करून आत्मविश्वास वाढवला पाहिजे. आधुनिक युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नैतिक आणि सामाजिक मूल्यांची शिकवण दिली पाहिजे. प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम, सहकार्य, इतरांचा आदर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यासारखी मूल्ये केवळ तोंडी सांगून चालणार नाही, तर शिक्षकांनी स्वतःच्या आचरणातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. आजच्या काळात ज्ञान आणि तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. त्यामुळे शिक्षकांनी स्वतःला सतत शिकत राहण्यास तयार ठेवले पाहिजे. नवीन शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम आणि अध्यापनाच्या पद्धती शिकून घेणे आवश्यक आहे. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांचे शिक्षकच नाही, तर स्वतःही एक विद्यार्थी असतात. नवीन तंत्रज्ञान, शिक्षणपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा समजून घेण्यासाठी त्यांनी कार्यशाळा, प्रशिक्षण आणि चर्चासत्रांमध्ये आवर्जून भाग घेतला पाहिजे. शिक्षण हे केवळ ज्ञान देणारे नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देणारे माध्यम आहे. शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता निर्माण करतो. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे. कोणताही विद्यार्थी कमजोर नसतो, फक्त त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या लहान यशाचे कौतुक केले पाहिजे. शिक्षण प्रक्रिया केवळ शाळेतच घडत नाही. ती पालक आणि समाजाच्या सहकार्याने पूर्ण होते.



आज शिक्षणसंस्थांनीही शिकवण्याची पद्धत बदलून प्रॅक्टिकलवर जास्त भर दिला पाहिजे. गुणांना कमी महत्त्व देऊन मूल्यांकनाला जास्त महत्त्व द्यायला हवे. जागतिकीकरणाचे फायदे हवे असतील, तर आपल्या मुलामुलींना जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे लागेल. जागतिक पातळीवरच्या रोजगारांची चाहूल आपल्याकडील युवकवर्गापर्यंत पोहोचली की ते इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी आदी भाषा शिकायला फक्त तयार होतील असे नव्हे, तर उत्सुकही बनतील. यासाठी प्रचंड प्रमाणावर शिक्षक लागतील हे खरे आहे; परंतु नेमक्या याच ठिकाणी आपण इ–शिक्षण, आभासी शाळा (व्हर्च्युअल क्लासरूम) अशा बाबींचा वापर करू शकतो! माहिती तंत्रज्ञान–सक्षमित शिक्षणपद्धतीचा आपल्याला मोठा उपयोग होणार आहे. प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो आणि त्याला वेगळ्या पद्धतीने शिकवण्याची गरज असते. शैक्षणिक ज्ञान देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

कोरोनानंतरच्या 'न्यू नॉर्मल'मध्ये अनेक व्यक्ती डिजिटल तंत्रज्ञान वापरू लागल्या. यात इमेल, सोशल मीडिया, इ व्यापार, ऑनलाइन व्यवहार यांचा समावेश होतो. यामुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक माहिती अनेक उद्योगांच्या हाती लागली आहे. या माहितीचा अनेक वेळा गैरवापर होताना आढळतो. या बाबतीत प्रचलित कायदे फारसे प्रभावी नाहीत. इथेच नैतिकतेचा मुद्दा महत्त्वाचा आहे. व्यवसायाचा हेतू फक्त लाभ असाच असता कामा नये. हे बाळकडू शालेय शिक्षणपद्धतीत अंतर्भूत केलेच पाहिजे. शिक्षण म्हणजे शाळा–कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र बदलायला हवे. पाया बळकट करून, प्रात्यक्षिकांवर भर देऊन, कार्यसंस्कृती अवलंबून रोजगारक्षम विद्यार्थी घडवणे हे आजच्या जमान्यात शिक्षकांचे खरे कार्य आहे. त्याचबरोबर मूल्ये, नीतीमत्ता, राष्ट्रप्रेम, सर्वसमावेशकता, संवेदनशिलताही महत्त्वाची आहे. स्वयंशिस्त आणि चांगला नागरिक घडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, मित्र आणि तत्त्वज्ञ बनले पाहिजे. त्यांनी स्वतःला सतत अद्ययावत ठेवले पाहिजे, तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

# सत्यशोधक समाज वर्धापन दिनानिमित्त जाहीर व्याख्यानाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस छ. संभाजीनगर प्रतिनिधी**/ सत्यशोधक समाज प्रतिष्ठानतर्फे सत्यशोधक समाज वर्धापन दिनानिमित्त सत्यशोधक समाज आणि आजचे वास्तव या विषयावर जाहीर व्याख्यानाचे आयोजन बुधवार, दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी सायं. ५ वा. मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र, मजनू हिल, टीव्ही सेंटर रोड, सलीम अली सरोजवळ, हडको, छ. संभाजीनगर येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड. डॉ. आर. शेळके (सत्यशोधक समाज कार्यकर्ते) हे असणार आहेत. प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. सुधाकर शेलार (सत्यशोधक अभ्यासक, अ.नगर) आणि प्रा. नूतन माळवी (सत्यशोधक महिला अभ्यासक, वर्धा) यांचे मार्गदर्शन होणार आहे.

या प्रसंगी साथी सुभाष लोमटे, प्रा. राम बाहेती, ॲड. शिवाजी शिंदे, डॉ. भीमराव बनसोड, ॲड. भगवान भोजने, प्रा. डॉ. संजय मून, सुभेदार सुखदेव बन, नौशाद उस्मान, सुभाष महेर आदी मान्यवर प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. के. ई. हरिदास (अध्यक्ष, सत्यशोधक समाज प्रतिष्ठान), इंजि. चेतन राऊत, प्रा. भारत सिरसाट, ड. वैशाली डोळस, डॉ. समाधान इंगळे, अनंत भवरे, इजि. महेश निनाळे, सविता अभ्यंकर, ग.ह. राठोड, डॉ. नवनाथ गोरे, रतनकुमार साळवे, डॉ. अरूण कांबळे, कॉ. मधुकर खिल्लारे, डॉ. सविता लोंढे, आशा डांगे, कॉ. वसुधा कल्याणकर, रामदास अभ्यंकर, डॉ. धोंडोपत मानवतकर, सुधाकर निसर्ग, अमरदीप वानखडे, भाऊ पठाडे, रमेशचंद्र धनेगावकर, डॉ. अविनाश अंकुशराव, प्रभाकर आरसूड, धम्मरक्षित सामुद्रे, ॲड. उमेश इंगळे, राहूल इंगळे, शिवनाथ पवार, प्रा. सुनिल वायसळ, प्रा. सुनिल बनकर, प्रा. गोपालकृष्ण खोमणे, विष्णू वखरे, निशांत पवार, वसंत जोगदंड प्रा. मारूती दवणे आदींनी केले आहे.

# घाटशेंद्रा सावरगाव परिसरात ढग फुटी होऊन नदी नाल्याचे पाणी शेतात व घरामध्ये फिरून मोठे नुकसान

**आत्ताच एक्सप्रेस कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील घाटशेंद्रा येथे ता २१ रविवार रात्री व सोमवार सकाळी ५ वाजेपर्यत घाटशेंद्रा सावरगाव चिंचोली परिसरात ढगफुटी होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पावसामुळे पिके वाहून गेले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आह . तसेच गावाच्या वरच्या बाजूला असलेला बेडुळ तलाव हा पूर्णपणे भरला असून धरणाने धोक्याची पातळी ओलांडली आह .

या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतात उभ्या असलेले पीक सोयाबीन, आहे. जनावरांच्या चार्याचा प्रश्न गंभीर झाला असून शेतकऱ्यांच्या रोजीरोटीवर गदा आली आहे. केवळ शेतकरीच नव्हे तर सामान्य नागरिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेकांच्या घरांची पडझड झाली आहे. सततच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या प्रचंड नुकसानीच्या पार्श्वभूमीवर ओला दुष्काळ




सर्वत्र नदी-नालेल्याना प्रचंड पूर आला आह त्यामुळे नदीकाठच्या भागात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. घाटशेंद्रा गावात

रविवारी रात्री दोन ते चार वाजेदरम्यान ढगफुटी होऊन ४० ते ५० घरांमध्ये पाणी शिरून संसार उपयोगी साहित्य वाहून गेले आह . गावकऱ्यांनी रात्र जागून काढली सर्वत्र भीतीचे वातावरण होते .पावसामुळे सर्व कापूस, मका व भाजीपाल्याचे पिके वाहून गेली आहे. अनेक ठिकाणी शेतात तुडुंब पाणी साचल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आह .

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतजमिनी वाहून गेल्या असून उभ्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी अक्षरशः रस्त्यावर आला जाहीर करावा आशी मागणी होत आहे. दरम्यान, पाऊस सातत्याने सुरू असल्याने आणखी भीषण परिस्थिती निर्माण होईल की काय, या भीतीचे वातावरण शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाले आहे. प्रशासनाने गावात येऊन तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी नुकसान ग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांनी केली .

# गंगापूर शहरातील मुख्य रस्त्यावरील स्ट्रिटलाईटची बत्ती अनेक दिवसांपासून गुल

**आत्ताच एक्सप्रेस गंगापूर / प्रतिनिधी / सुभान शहा**/ गंगापूर शहरातील वैजापूर रोडवरील स्ट्रीटलाईटचे काम पूर्ण झाल्यानंतर या कामाचे उद्घाटन दि.१३ अगस्ट २०२२ रोजी रात्री नऊ वाजता विठ्ठल आश्रम येथील ह.भ.प. गुरुवर्य रामभाऊ महाराज राऊत यांच्या हस्ते स्ट्रिटलाईट चे पुजन करून बटन चालू करून स्ट्रिटलाईट चालू करण्यात आले होते. मोजके चार ते आठ दिवस लाईट चालू राहिली नंतर काही दिवस लाईट बंद असल्यामुळे या ठिकाणी रोडवर अपघात देखील झालेले होते. तसेच पुन्हा काही दिवसानंतर लाईट चालू करण्यात आली काही दिवस लाईट चालू राहिली पुन्हा लाईट बंद झाली याकडे प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याची चर्चा आहे. सध्या सना सुदिचे दिवस सुरू आहे. मुख्य रस्त्यावर काही ठिकाणी लाईट चालू नसल्यामुळे चोऱ्या अपघात असे काही दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे प्रशासन लक्ष करणार का? मुख्य रस्त्यावरील स्ट्रिटलाईट सुरळीत चालू होणार का? प्रशासनाला लवकरात लवकर मुख्य रस्त्यावरील स्ट्रिटलाईट चालू करावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकाकडून जोर धरत आहे. या प्रकरणाकडे प्रशासन काय भूमिका घेणार याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.



## सावळदबारा परिसरात वन्य प्राण्यांकडुन खरिप पिकांचे नुकसान

# वन विभागाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी - गुलाबराव पाटील कोलते व शेतकरी

**आत्ताच एक्सप्रेस सावळदबारा प्रतिनिधी**/ सावळदबारा परिसरात खरीप पिकाची मोठ्या प्रमाणात वन्य प्राणी नुकसान करत आहेत सावळदबारा परिसरातील ठिकठिकाच्या शेतातील कपाशी,मका,सोयाबीन,मुग, उडीद, आदी पिकांचे रोही व वन्य प्राणी नुकसान करित आहेत वन विभागाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व परिसरातील शेतकरी करित आहेत.

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा हा परिसर डोंगर भाग आहे सावळदबारा परिसरातील डोंगर जवळील शेतात मध्ये वन्य प्राणी हे रात्रीच्या सुमारास येऊन कपाशी,मका,सोयाबीन, ही पिके खाऊन घेत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना राखन करण्यासाठी शेतात जावे लागत आहेत शेतक-यांनी मोठ्या प्रमाणात कपाशी,सोयाबीन.मका या पिकांची लागवड केली आहेत वन्य प्राणी शेतात येऊन पिक खाऊन घेत आहे त्यामुळे शेतकरी रात्रीच्या सुमारास शेतात जाऊन राखण करत आहे सावळदबारा परिसरात वन्य प्राणी कपाशी,मका,सोयाबीन,मुग, उडीद,या पिकाचे नुकसान करत आहेत सावळदबारा हा परिसर डोंगर भाग असलेल्या मुळे शेतक-यांना पिक जगवणे कठिण असते दिवसा सुद्धा रोहीचे टोळी ही शेतात येऊन नुकसान करतात सोयगाव तालुक्यातील सावळद बारा,टिटवी,मूर्ती,घाणेगाव,मोल खेडा,देव्हारी,नांदाताडां,पिपळ वाडी,हिवरी,नांदागाव,रवळा,ज वळा,जामठी,महालब्धा,डाभा. आदी भाग डोंगर असल्यामुळे येथे रात्री च्या सुमारास डोंगर जवळील शेतात रोही च्या टोळी शेतात येऊन कपाशी,सोयाबीन, मका.या खरिप पिकांचे नुकसान करतात सावळदबारा परिसरात शेतकरी रात्री शेतात राखन करण्यासाठी जावे लागते दिवसा सुद्धा शेतात राखन करावे लागते सावळदबारा परिसरातील डोंगर जवळील पिके मोठ्या प्रमाणात वन्य प्राणी हे पिकांचे नुकसान करत आहेत सोयगाव तालुक्यातील सावळदबारा हा परिसर संपूर्ण डोंगर भाग असल्यामुळे डोंगराजवळ शेतातील शेतकऱ्यांना राखण करण्यासाठी शेतात जावे लागते दिवसासुद्धा शेतकऱ्यांच्या शेतात रोही येऊन पिकांची नासाडी करतात त्यामुळे सावळदबारा सह परिसरातील शेतकरी रात्रीच्या सुमारास फटाके फोडताना दिसत आहेत वन्यप्राणी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करत आहेत सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांचे शेत डोंगराजवळ असल्याने वन्यप्राणी रात्रीच्या सुमारास शेतात येतात पिकांचे नुकसान करत आहेत वन्य प्राणी पिके नुकसान करत आहेत

सावळदबारा डोगर जवळील शेतात मोठ्या प्रमाणात वन्यप्राणी पिकांचे नुकसान करत आहेत..

वन विभागाने परिसरातील नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व सावळदबारा परिसरातील शेतकरी करित आहेत.



सावळदबारा सह परिसरातील शेतातील पिकाचे वन्य प्राणी नुकसान करत आहेत शेतकरी शेत राखण करण्यासाठी रात्रीच्या वेळी शेतात जात आहेत शेतात फटाके फोडताना दिसत आहे सावळदबारा हा भाग डोंगर भाग आहेत डोगर जवळील शेतात वन्यप्राणी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करित आहेत वन्यप्राणी कपाशी,मका,सोयाबीन,मुग, उडीद,मोठ्या प्रमाणात पिकाचे नुकसान करत आहेत पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व शेतकरी करीत आहेत. मक्का. कपाशी.तूर. सोयाबीन. उडीद. मुग. हे पिके वन्यप्राणी डोंगर जवळ शेतात येऊन नुकसान करत आहे.

सावळदबारा सह घाणेगाव, टिटवी, पळसखेडा, पिपळवाडी, देव्हारी, मोलखेडा, हिवरी, नांदातांडा, मूर्ती, डाभा,महालब्धा, पिपळा, जामठी, रवळा, जवळा, हा परिसर डोगर भाग असल्याने वन्य प्राणी खरीप पिकाचे नुकसान करत आहेत.

# तुळजापूर ४०० किमी सावळदबारा येथील युवकांनी पायी चालत ज्योत आणली

## सर्व युवकाचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांच्याकडून स्वागत

**आत्ताच एक्सप्रेस सावळदबारा प्रतिनिधी**/ सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील युवकांनी तुळजापूर ४०० किलोमीटर अंतरावरील सावळदबारा गावापर्यंत पायी चालत ज्योत आणली आहेत ज्योत घेऊन २२ सप्टेंबर रोजी सावळदबारा येथे आगमन झाले आहे. गावात ज्योत घेऊन आल्यानंतर ढोल ताशाच्या गजरात होते

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते,गणेश नरोटे,ज्ञानेश्वर वरखड,सागर कुल्ली, निवृत्ती खडके, जीवन कुल्ली,आदेश पाटील, दिपक




त्यांचे स्वागत करण्यात आले

या सर्वांचे युवकांचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते याच्या वतीने स्वागत केले

तुळजापूर येथून पायी चालत ज्योत गावात आल्यानंतर घराघरासमोर रांगोळी काढण्यात आले गलबले, प्रतिक देशमुख, यश टिकारे,नामेदव जाधव,ज्ञानेश्वर सोनवणे,यश पाटील, मगेश टिकारे, चेतन इगळे,प्रकाश देशमुख,मयुर सपाटे,पंकज टिकारे. यश पधाडे,शंकर खराटे,संदिप कोलते, गोपाल सपाटे, पवन कुल्ली,विशाल खडके,तुकाराम खिरडकर तसेच आदी होते.

# जिल्हा परिषद शाळा रायगाव येथे निरोप समारंभ संपन्न

## गिरधारी नरवडे सर यांना निरोप तर श्री सुरेश कुलकर्णी सर यांचे स्वागत

**आताच एक्सप्रेस प्रतिनिधी कोकाटे हादगाव/सोपान वाघमारे**/ परतुर तालुक्यातील मौजे रायगव्हाण येथील जि. प. प्रा. शाळा येथे व्यासपीठावरील सर्व शिक्षक व नागरिक शाळेचे मुख्याध्यापक सर

यांनी सावित्राबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला घालून राष्ट्रगीत घेण्यात आले त्यानंतर निरोप समारंभांना सुरुवात करण्यात आले रायगव्हाण. येथे आठ वर्षे कार्यरत असल्याने नरवडे सर यांनी फार मोठ्या काळाची सेवा या रायगव्हाण जि .प . प्रा . शाळेमध्ये केली आहे .

सरांचे अनेक विद्यार्थी आजकालच्या भविष्यात डॉक्टर इंजिनिअर सरकारी कर्मचारी म्हणून वावरतील येथे उपस्थित नसलेले कितीतरी विद्यार्थ्याचे वतीने मला मनाया वाटते की आजचा हा निरोप समारंभ नसून त्यांच्याप्रती कुतज्ञाता सोहळाआहे आदरणीय नरवडे सर यांनी या शाळेसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी तन मन लावून कार्य केले आहे केवळ नोकरी म्हणून त्यांनी ही जबाबदारी पार पडली कदापिही नाही आपले जीवन ध्येय समजून आपली सेवा पूर्ण केली आहे.

त्यांनी त्यांच्या कनिष्ठ व वरिष्ठ सहकार्याची सोबत सोबत राहून भरपूर कामे केली गावातील नागरिकानीही मोठा भरपूर प्रतिसाद दिला.



# कन्नड नगर परिषदेची झाली अकार्यान्वित दैनिय अवस्था,मा.उपनगराध्यक्ष डॉ.पाटलांचा आरोप

**आत्ताच एक्सप्रेस कन्नड प्रतिनिधी/उदय कुलकर्णी** / कन्नड नगरपरिषदेचा कारभार दिवसेंदिवस ढासाळत चालला असून बाप भीक मागू देत नाही तर माय जेऊ घालत नाही अशी अवस्था कन्नड नगरपरिषदेची झाली आहे.या नगरपरिषदेवर सद्या प्रशासकांचे राज्य असुन सुद्धा त्याच्या दैनंदिन कारभाराकडे कोणाचेही लक्ष नाही. मुख्याधिकारी यांच्याकडे दोन ते तीन ठिकाणचा अतिरिक्त चार्ज असल्याचे समजते, आणि त्यातही ते सद्या वैद्यकीय रजेवर असल्यामुळे कन्नड नगरपरिषदेच्या खोळंबलेल्या कामकाजाकडे लक्ष देणेसाठी कोणाकडे वेळच नही.




मात्र ऐन सणासुदीच्या काळातच नगरपरिषदेने हा उच्छाद मांडला आहे. नवरात्र उत्सवा निमित्य वार्डा वार्डात सद्या दुर्गादेवी मंडळाची स्थापना होत आहे. परंतु बऱ्याच ठिकाणी अती घाणीचे तसेच दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असुन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.व त्याचा नाहक त्रास करदात्यांना सहन करावा लागत आहे.

गेल्या आठवडा भरापासून नगरपरिषदेच्या सफाई कामगारांनी कष्टाचे मानधनच मिळत नसल्यामुळे काम बंद ठेवलेले आहे.घंटागाडी व ट्रॅक्टरला चालवण्यासाठी चालक उपलब्ध होत नाही. कारण की त्याला मानधनच नाही. त्यात पुन्हा घंटागाडीला डिझेल नाही.मात्र नागरिकांकडून नेहमीच टॅक्स वसुलीचे काम जोरात चालू असते, त्याला कधीही खंड पडत नाही.उलट नागरिकही टॅक्स भरतच असतात, तरी शहरात सफाई ऐवजी दुर्गंधी सुटल्याचे दिसून येत आहे.असा आरोप मा.उपनगराध्यक्ष तथा शिवसेना शहराध्यक्ष डॉ.सादाशिव पाटील यांनी केला असुन त्यांनी पुढे असेही नमुद केले की, गोरगरीब सफाई कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत करावे जेणे करून गरीब कर्मचाऱ्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे हाल होणार नाही. नगरपालिका प्रशासनाने त्याकडे तात्काळ लक्ष घालून निजान या सणासुदीच्या काळात तरी शहरातील घाण व तुंबलेल्या नाल्या साफ करून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून मोकळा श्वास त्यांना घेता येईल अशी यंत्रणा कार्यान्वित करावी अशी माफक अपेक्षा त्यांनी या अकार्यान्वित नगरपरिषदे कडुन केली आहे.

# न्यानविकास विद्यालयात येणार्या सर्व ज्योतींनेचे पूजन केले

**आत्ताच एक्सप्रेस कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम** / नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात जल्लोषात सुरू होत असून, भराडी येथील तुळजा भवानी नवरात्र उत्सव व ग्रामस्थ वतीने पुढाकार घेत कोल्हापूर येथील महालक्षी मातेच्या गाभाऱ्यातून श्रद्धेची ज्योत ५२० किलो मीटर पायी प्रवास करून भराडीत दाखल झाली. रेलगाव येथील मंडळाने तुळजापूर येथून, घंटामबरी येथील मंडळाने माहूर, रेलगाववाडी मंडळाने कोल्हापूर,बोजगाव येथील मंडळाने तुळजापूर,नेवपुर येथील मंडळाने तुळजापूर, पांगरी येथील मंडळाने सप्तशृंगी, बाळापूर येथील मंडळाने वणी-गढ सप्तशृंगी, निंभोरा खानदेश मंडळाने तुळजापूर येथून ज्योती आणल्याने भराडीसह पंचक्रोशीतील भाविक व अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाचे ज्ञानविकास विद्यालय वतीने येणाऱ्या जाणाऱ्या ज्योतीनचे पूजन करून भाविकांचे स्वागत करण्यात आले.



## जालन्यात निलम नगर येथे नवनाथ वाघमारे यांच्या स्कॉर्पिओ गाडीला आग; घटनेचं सीसीटीव्ही फुटेज आलं समोर..

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनीधी**/ जालन्यात ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांच्या स्कार्पीओ गाडीला अज्ञाताने लावली आग संपुर्ण घटना सीसी टीव्ही कमेऱ्यात कैद झाली अज्ञात ईसम ज्वलनशिल पदार्थ गाडीवर टाकत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

जालना शहरातील निलम नगर परिसरात रविवारी रात्री असून, कदीम जालना पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे.

वाघमारे यांच्या घराबाहेरील पार्किंगमध्ये कपड्याने झाकून ठेवलेल्या त्यांच्या स्कॉर्पिओ गाडीवर अज्ञात हल्लेखोराने ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावल्याचं सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आलं आहे.

फुटेजमध्ये तो व्यक्ती बाजूच्या कंपाऊंडवरून येताना



दहाच्या सुमारास ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांच्या स्कॉर्पिओ गाडीला आग लावल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, एका अज्ञात व्यक्तीने गाडीला जाळून टाकल्याचं स्पष्ट दिसत आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं आणि गाडीला आग लावून पुन्हा त्याच कंपाऊंडवरून उडी मारून पळून जाताना दिसत आहे.

या घटनेमुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलं असून, पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी तातडीने तपास सुरू केला आहे. यामागे राजकीय किंवा वैयक्तिक वाद आहे का, याचा सर्व बाजूंनी पोलीस तपास करत आहेत.

# जालन्याच्या विरेगाव येथील कल्याणी नदीच्या पुरात अडकलेल्या २० नागरिकांची सुखरूप सुटका...

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनीधी**/ २२ सोमवार रोजी चार वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालन्याच्या विरेगाव येथील कल्याणी नदीच्या पुरात अडकलेल्या नागरिकांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. अग्निशमन दलाच्या आज सकाळी हे लोक नदीच्या पात्रालगतच्या शेतात गेले होते. त्याचवेळी अचानक नदीला पूर आल्याने ते पाण्यात अडकले. पाण्याचा जोर जास्त असल्याने त्यांना बाहेर पडणे शक्य होत नव्हते.

यावेळी स्थानिकांनी तात्काळ जिल्हा अखेर जवानांनी बोटीद्वारे चार महिला १६ पुरुष आणि ३० शेळ्यांची रेस्क्यू ऑपरेशन यशस्वीपणे पूर्ण केले.

पुराच्या पाण्यात अडकलेले या भागातील नागरिक सुखरूप बाहेर काढण्यात आले आहेत.



जवानांनी बोटीतून हे रेस्क्यू ऑपरेशन केले. ०४ महिला १६ पुरुष आणि ३० शेळ्यांची सुखरूप सुटका ..जालना तालुक्यातील विरेगाव येथे कल्याणी नदीला आलेल्या पुराच्या पाण्यात ३० ते ३५ नागरिक अडकले होते. प्रशासनाशी संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर आणि जिल्हाधिकारी अशीमा मित्तल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अग्निशमन दलाला तातडीने कारवाईचे निर्देश दिले.

परंतु याच नदीच्या दुसऱ्या बाजूला पुन्हा सात ते आठ नागरिक सकाळपासून अडकलेले आहेत. आता अग्निशमन दलाचे जवान त्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन करत आहेत.

# रोटरी क्लबच्या शांती सप्ताहाने जनतेच्या मनात खोलवर रुजविला शांततेचा संदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनीधी**/ रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे २१ सप्टेंबर या जागतिक शांतता दिनानिमित्त १५ ते २१ सप्टेंबरदरम्यान आयोजित शांती सप्ताह अंतर्गत शांतीस्तंभ स्थापना, ध्यान साधना शिबिर, निबंध, वक्तृत्व व चित्रकला स्पर्धा, शांती रॅली, स्वाक्षरी अभियान, शांततेची प्रतिज्ञा आदी उपक्रम राबवून समाजमनात शांततेचे महत्त्व दृढ करण्यात आले.

या उपक्रमांची सुरुवात १५ सप्टेंबर रोजी देऊळगाव राजा रोडवरील स्व. बाबुराव काळे चौकात शांतीस्तंभ उभारणी व घनवन प्रकल्प लोकार्पणाने झाली. शांतीचा संदेश वृक्षारोपणातून समाजात रुजविण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

संपूर्ण आठवडाभर चाललेल्या कार्यक्रमांत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत शांततेशिवाय जगण्याचा पर्याय नाही हा संदेश विविध अंगाने प्रभावीपणे मांडला. वक्तृत्व स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी समाजातील संघर्ष, हिंसाचार आणि तणावाला शांततामय मार्गाने उत्तर देण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रंगांच्या माध्यमातून युद्धमुक्त जग, बंधुभाव, एकात्मता आणि अहिंसेचे विचार मांडत शांततेचे रंग जागवले.

याशिवाय आर्ट ऑफ लिव्हिंगचे अरुण मोहता यांनी श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ध्यान शिबिर घेतले.

महावीर स्थानकवाशी जैन माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना शांततेची प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच भव्य शांतता रॅली काढण्यात आली. हॅण्ड प्रिंट उपक्रम व स्वाक्षरी मोहिमेत विद्यार्थी, नागरिक आणि क्लबच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

समारोप प्रसंगी रोटरी क्लबच्या अध्यक्ष वर्षा पित्ती यांनी आपल्या भाषणात शांततेचे सार्वत्रिक महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, रोटरी ही संस्था सात प्रमुख उद्दिष्टांवर काम करते आणि त्यापैकी शांतता हे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. वक्तृत्व, निबंध आणि चित्रकला या स्पर्धा केवळ स्पर्धा न ठरता विद्यार्थ्यांमधील शांततेची



खरी जाण व विचारांची खोली आत्मसात करण्याचे साधन ठरली आहे. शांततेची खरी सुरुवात मनातून होते; ती कुटुंब, समाज आणि अखेरीस संपूर्ण जगासाठी मार्गदर्शक ठरते.

या आठवड्याचे उपक्रम म्हणजे भावी पिढ्यांना संघर्षाऐवजी संवादाची, तणावाऐवजी समाधानाचे आणि दुश्मनीऐवजी मैत्रीची शिकवण देणारे पाऊल ठरले आहे.

कार्यक्रमात क्लबचे सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्प प्रमुख शिवरतन बगडिया, रमेश मगरे, हेमंत ठक्कर, जितेंद्र अग्रवाल, डॉ. दीपक बगडिया, अरुण मोहता, सुरेश मगरे, अरुण अग्रवाल, अनिल कुलकर्णी आदी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### बालाजी मंदिर संभाजीनगर जालना येथे नवरात्र ब्रह्मोत्सवास आज पासून प्रारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनीधी**/ जालना शहरातील संभाजीनगर येथे बालाजी बालाजी मंदिरात आज सोमवार रोजी संध्याकाळी सात वाजता अंकुर अर्पण पूजनाने नवरात्र ब्रह्मोत्सवास प्रारंभ होत आहे. या नवरात्र ब्रह्मोत्सवा साठी तिरुपती येथून बालाजी पाठशालेतून प्रशिक्षित सहा स्वामीच्या मार्गदर्शनाखाली हा ब्रह्मोत्सव संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी बालाजी भगवान साठी पुष्पहार बनवणारे, प्रसाद बनवणारे तसेच वाद्यवृंद सुद्धा तिरुपती येथून आले आहेत. हा कार्यक्रम नऊ दिवशीय चालणार असून सकाळी साडेसहा वाजता दैनिक अभिषेक, साडेआठ वाजता महाआरती, सकाळी नऊ वाजता उत्सव मूर्ती यज्ञ शाळा प्रवेश, साडेअकरा वाजता हवन पूर्णाहूती, बारा वाजता उत्सव मूर्ती अभिषेक, दुपारी साडेबारा वाजता मध्यान्ह आरती, संध्याकाळी सात वाजता हवन पूर्णाहुती, सायंकाळी साडेसात वाजता झुला उत्सव, आठ वाजता शोभायात्रा व रात्री साडेनऊ वाजता शयन आरती असे या कार्यक्रमाचे दैनंदिन वेळापत्रक असणार आहे. दिनांक पाच ऑक्टोबर रविवार रोजी महाप्रसादीचा कार्यक्रम दुपारी एक ते तीन वाजेच्या दरम्यान आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे मुख्य यजमान नारायण दादा चाळगे, श्रीकांत भानुदास राव घुले, मुख्य भंडारा यजमान श्री आकाश वामनराव राऊत व श्री अमोल वामनराव राऊत, स्वागत यजमान माननीय श्री प्रतीक दानवे पाटील, माननीय श्री शैलेश सुभाष चंद्रजी देविदान हे असणार आहेत. तसेच राजुरी स्टील ग्रुप, श्री जगदीश खट्टर, , श्री विष्णू डोंगरे श्री बालाजी चंद्रभानजी गारखेडे, श्री हरिभाऊ नाटकर श्री सूर्यनारायण गजबी, श्री राम नारायण बाहेती, श्री हुकुमचंद पाटणी श्री राजेशजी अग्रवाल, , सुखदेव जोधराज सराफ, श्री राजेश जगताप श्री संतोष मोहिते श्री भगवानराव देशमुख श्री प्रीतम लोणगावकर हे सर्व व इतर दैनंदिन कार्यक्रमाचे यजमान असून सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान आयोजक ब्रह्मोत्सव सेवा समितीचे अध्यक्ष त्रिभुवन राऊत, उपाध्यक्ष श्याम लोया, सचिव अंकुश राऊत, सदस्य निवृत्ती पाचफुले महाराज,अरुण मसाने, विजय केलानी, जगनभाऊ खडके, हिम्मतराव शिंदे, कारभारी वाघ, गोविंद प्रसाद मुंदडा काळे गुरुजी, दीपक जगताप, प्रकाश जगताप, सदाशिव आगलावे, डॉक्टर मुक्ताराम खरात, ठाकूर तलाठी, सुधाकर काळे इत्यादींनी केले आहे.

### माजी रेल्वे राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नांना यश

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनीधी**/जालना शहरातील उद्योग नगरी परिसरातील श्री सत्यजित राय, उत्तर भारतीय संघाचे शितला प्रसाद पांडे व उत्तर भारतीय नागरिकांनी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची भेट घेऊन जालना ते पटना रेल्वे मार्गाची मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत रावसाहेब दानवे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन जालना व परिसरातील सुमारे पंचवीस हजार उत्तर भारतीय नागरिकांच्या सोयीसाठी या गाडीची मागणी केली. या प्रयत्नाला यश आले असून रेल्वे प्रशासनाने नांदेड-रायचूर व पूर्णा- पटना या दोन्ही गाड्यांचा विस्तार आता जालना पर्यंत करण्याचा निर्णय घेतला आहे. नांदेड-रायचूर ही गाडी तात्पुरत्या स्वरूपात जालना वरून सुरू होणार असून प्रथमतः नांदेडला जाईल आणि त्यानंतर रायचूरपर्यंत धावेल. तसेच पूर्णा-पटना ही गाडी देखील जालना पासूनच उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे जालना, परभणी, पूर्णा व नांदेड या भागातील प्रवाशांना रायचूर व पटना भागात जाण्यासाठी थेट रेल्वे सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे प्रवाशांचा मोठा वेळ व खर्च वाचणार आहे. या निर्णयाचे स्वागत नागरिकांकडून होत असून माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## धनगर समाज आरक्षणासाठी डॉ. कल्याणराव काळे यांचा पाठिंबा जाहिर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनीधी**/ धनगर समाज आरक्षणासाठी जालना येथे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ पासून सुरु असलेल्या उपोषणाला आज सहावा दिवस झाला आहे. या उपोषण स्थळी जालना जिल्ह्याचे खासदार मा. डॉ. कल्याणराव काळे साहेब यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांची तब्येतीची विचारपूस केली तसेच आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला.



यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, कल्याणजी दळे, जे. प्रकाश चव्हाण, बबलू चौधरी, अजय बनकर, त्रिंबक पाबळे, कृष्णा पडूळ,रघुवीर गुडे, लक्ष्मण मसलेकर, श्रीरंग कामटे, राम शिरसाठ, सोपान तिरुके, ज्ञानेश्वर इंगोले, विष्णू पाटील शेजुळ आदी पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले हे आंदोलन गांभीर्याने घेऊन शासनाने तात्काळ सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनीधी**/प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. २२ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलका ते मध्यम स्वरुपाची पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. २५ व २६ सप्टेंबर २०२५ रोजी हलक्या स्वरुपाचा पाऊस स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकयांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती बैठक संपन्न

## अंमली पदार्थ प्रतिबंधासाठी दोषींवर कायदेशिर कारवाई करावी - अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनीधी**/ अंमली पदार्थाच्या सेवनामुळे मानवी शरीरावर, मनावर गंभीर परिणाम होत असतात. परिणामत: समाजावर देखील त्याचे गंभीर दुष्परिणाम दिसून येतात. त्याकरीता जिल्ह्यात अंमली पदार्थांचा प्रतिबंधासाठी सर्व विभागानी सतर्क राहून दोषींवर कायदेशिर कारवाई करण्याच्या सूचनाअपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी दिलया.

अंमली पदार्थांच्या वापरावर प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी पोलीस निरिक्षक एस.एम. इंगेवाड, अन्न व औषध प्रशासनचे औषध सहायक आयुक्त जी. द. जाधव, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरिक्षक प्रविण ठाकूर, हेड पोस्ट ऑफिसचे अमोल बेंडे, जिल्हा कृषि अधिक्षक विभागाच्या व्ही.बी.भोर, उपविभागीय अधिकारी जालना नायब तहसिलदार शैलेश राजमाने, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी श्रीमती मैत्रेवार म्हणाल्या की, औषध विक्रेत्यांकडून अनेकदा बंदी घातलेल्या औषधांतील काही ठराविक घटक असलेली वेगळी औषधे विक्री केली जातात. त्यामुळे डॉक्टरांच्या प्रिक्रिप्शनशिवाय औषधांची विक्री होता कामा नये. याबाबत मेडिकल स्टोअर्सची नियमित तपासणी करावी. टपाल विभागाने पार्सल प्राप्त करणाऱ्याची चौकशी करुन व त्या पार्सलमध्ये काय आहे, याची तपासणी करुनच संबंधित व्यक्तीला पार्सल द्यावे. बंद पडलेल्या कारखान्यांत अवैध अमंली पदार्थाचे उत्पादन निर्मितीचे होण्याची शक्यता असल्याने अशा कारखान्यांची वेळोवेळी तपासणी करण्यात यावी. आजची युवा पिढी अंमली पदार्थाच्या आहारी जावू नये यासाठी बालवयातच त्याच्या दुष्परिणामाची माहिती त्यांना झाली पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयातून विद्यार्थी व युवक-युवतींमध्ये व्यापक जनजागृतीच्या माध्यमातून अंमली पदार्थाच्या सेवनाचे दुष्परिणाम सांगण्यात यावे. अंमली पदार्थांचे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम, टपालाच्या माध्यमातून अंमली पदार्थांची मागणी व पुरवठा होणार नाही तसेच जिल्ह्यात खसखस किंवा गांजा पिकाची अवैध लागवड होणार नाही याची सर्व संबंधीत विभागानी दक्षता घ्यावी. व्यसनमुक्ती केंद्रांशी समन्वय ठेवून, दाखल झालेल्या व्यक्तींना कोणत्या अंमली पदार्थांचे व्यसन आहे, याबाबतची माहिती घ्यावी. शाळा आणि महाविद्यालयापुरतेच मर्यादित न राहता गावपातळीवर देखील अंमली पदार्थाच्या सेवनाच्या दुष्परिणामाची माहिती द्यावी. शाळा, महाविद्यालय आणि ग्रामपंचायतस्तरावर व्यापक जनजागृती करण्याचे निर्देशही यावेळी श्रीमती मैत्रेवार यांनी दिले. अंमली पदार्थांविरुध्द गुन्हे व करावयाची कार्यवाहीबाबत यावेळी आढावा घेण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813